# आर्थिक सर्वेक्षण २०१६-१७ : अर्थव्यवस्थेची अवस्था

उदारमतवादी बुद्धिजीवी व्यक्तीनं भीती अथवा पक्षपाती लोभ न बाळगता सत्य बोलावं आणि लिहावं, अशी सर्वसाधारण अपेक्षा असते. याशिवाय आपल्या आजूबाजूच्या जगाविषयी प्रश्न उपस्थित करणं, या जगाची चिकित्सा करणं, हेही महत्त्वाचे गुण उदारमतवादी बुद्धिजीवी व्यक्तीमध्ये असावेत, असं आपल्याला वाटत असतं. परंतु केंद्र सरकारनं नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या 'आर्थिक सर्वेक्षण २०१६–१७'ची तपासणी केली असता हा दस्तावेज तयार करणाऱ्या अर्थशास्त्रज्ञांच्या व आर्थिक प्रशासकांच्या उदारमतवादाविषयी गंभीर शंका उपस्थित होतात. अर्थव्यवस्थेच्या अवस्थेचा लेखाजोखा मांडणारं हे सर्वेक्षण ३१ जानेवारीला, म्हणजे 'अर्थसंकल्प २०१७–१८' सादर व्हायच्या आदल्या दिवशी, प्रसिद्ध करण्यात आलं. खरं तर राजकीय अवकाश आता बऱ्याच प्रमाणात उजवीकडे कलला आहे, शिवाय काँग्रेस पक्ष व भारतीय जनता पक्ष हे दोन मुख्य राष्ट्रीय पक्षही उदारमतवादापासून बरेच दूर आहेत. अशा परिस्थितीत सरकारी प्रशासन यंत्रणेतील उदारमतवाद्यांनाही 'उदारमतवादी असणं म्हणजे काय' याचा अनेकदा विसर पडत असावा.

गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पावेळी अर्थमंत्री व पंतप्रधान यांनी कोणतं आश्वासन दिलं होतं, याची माहिती आपण घ्यायला हवी, असा विचारही या वर्षीच्या (किंवा खरं तर गतकाळातील कोणत्याही) आर्थिक सर्वेक्षणाचं लेखन करणाऱ्या व्यक्तींनी केलेला नसावा. आपला अर्थसंकल्प 'शेतकऱ्यांच्या व गरिबांच्या हिताचा' आहे असा दावा केंद्रीय अर्थमंत्री अरुण जेटली यांनी केला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी तर असं ठामपणे सांगितलं होतं की, पाच वर्षांमध्ये शेतकऱ्यांचं उत्पन्न 'दुप्पट' करणं हे आपलं उद्दिष्ट आहे. (मोदींचं हे उद्दिष्ट चलनवाढीशी जुळवून घेण्याच्या संदर्भात असावं, असा समज त्यांच्या उक्तीवर विश्वास ठेवलेल्या शेतकऱ्यांचा झाला असेल). सरकारमधील उदारमतवादी व्यक्तींनी दोषांवरही बोट ठेवायला हवं असतं. केंद्रीय अर्थसंकल्पांचं 'मार्केटिंग' व 'पॅकेजिंग' ज्या चढ्या सुरात केलं जातं त्यामुळे प्रत्येकजण भारावलेला असतो. पण सरकारनं स्वतः साठी ठरवलेल्या अग्रक्रमांबाबत कितपत कामगिरी प्रत्यक्षात केली, हे तपासण्यासाठी अर्थव्यवस्थेची अवस्था जनतेसमोर मांडायला नको का? की, जेटली व मोदी आपल्या शेतकऱ्यांची केवळ टिंगलटवाळी करत आहेत? फळं व भाज्या यांसारख्या अन्नोत्पादनांचं विपणन बहुराष्ट्रीय उद्योगसमूहांसाठी खुलं करून या उत्पादनांमधील लघुउद्योजकांचा मोठा लाभ आपण करून देत आहोत, असा या दोन्ही नेत्यांचा समज होता. शेतीमधील सार्वजनिक गुंतवणुकीतील घसरणीला शेतकी सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) प्रमाणात उलटं फिरवणं, त्यांच्या उद्दिष्टांसाठी उपकारक ठरलं असतं, पण हा विचारही त्यांनी केला नाही.

सर्वसाधारणपणे आर्थिक सर्वेक्षण अहवालामध्ये स्थूल–अर्थशास्त्रीय (मॅक्रो–इकॉनॉमिक्स) आकडेवारी दिलेली असते आणि त्याद्वारे अर्थव्यवस्थेच्या अवस्थेची तपासणी करता येते. परंतु या वेळी एखाद्या स्वतंत्र उदारमतवादी अर्थशास्त्रज्ञाला अशीही संधी आर्थिक सर्वेक्षणानं ठेवलेली नाही. अशा प्रकारच्या आकडेवारीसाठी 'वर्षाच्या उत्तरार्धाची वाट पाहावी', असं सरकारचे मुख्य आर्थिक

सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांनी सर्वेक्षणाच्या प्रस्तावनेत वाचकांना सांगितलं आहे. पण तरीही या आर्थिक सर्वेक्षण अहवालात 'कणखर स्थूल आर्थिक स्थैर्या'चा दावा मात्र करण्यात आला आहे. आर्थिक प्रगतीमध्ये २०१६-१७ या वर्षात झालेली घट केवळ 'तात्कालिक' आहे, प्रगतीचा प्रवाह '२०१७-१८ मध्ये पुन्हा खळाळू लागेल', असंही यात म्हटलं आहे. कर प्रशासनानं 'अत्युत्साहा'नं वर्तन केले नाही, तर 'निश्चलनीकरणाचे (डिमॉनेटायझेशन) दीर्घकालीन लाभ' आता प्रत्यक्षात येणारच आहेत. केंद्र सरकारनं 'या वर्षात जीडीपीच्या ३.५ टक्के वित्तीय तूट साधण्याचा' निर्धार पूर्ण केल्याबद्दल आर्थिक सर्वेक्षण अहवालात केंद्र सरकारची वाखाणणी करण्यात आली आहे. परंतु 'प्रगतीचे प्रभुत्वशाली आणि टिकाऊ स्रोत म्हणून खाजगी गुंतवणूक आणि निर्यात यांची पुनर्स्थापना' करण्याच्या बाबतीत चिंताही यात व्यक्त करण्यात आली आहे. 'निश्चलनीकरणा'मुळे 'जीडीपी आणि आर्थिक कामकाजावर विपरीत परिणाम झाला असला', तरी ही तात्कालिक घसरण आहे, '७ टक्क्यांच्या पायाभूत अंदाजाच्या तुलनेत जीडीपीमध्ये ०.२५ ते ०.५ टक्के इतक्याच अंकांची घट झाली आहे', असं या अहवालात म्हटलं आहे.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीनं जानेवारी २०१७मध्ये जागतिक अर्थव्यवस्थेच्या प्रगतीविषयीचा अंदाज वर्तवला. २०१६मध्ये ३.१ टक्क्यानं झालेली प्रगती २०१७ साली ३.४ टक्क्यांनी होईल, असं नाणेनिधीनं म्हटलं होतं. त्या आधारे २०१७-१८ वर्षासाठीचं आर्थिक सर्वेक्षण मांडताना असं सांगण्यात आलं की, 'भारतीय निर्यातीचा विकास जागतिक जीडीपीच्या बदलासोबत लवचीक राहिला आहे, त्यामुळं पुढच्या वर्षी निर्यातीद्वारे आर्थिक प्रगतीमध्ये सुमारे एक टक्क्यानं वाढ होईल.' घरबांधणी, टिकाऊ व निमटिकाऊ ग्राहकोपयोगी वस्तूंची खाजगी ग्रहणासाठीची मागणी पूर्ववत होण्याची अपेक्षा आहे. परंतु 'दुहेरी ताळेबंद समस्ये'मुळं (कर्ज देणाऱ्या संस्था व कर्जदार व्यवसाय यांच्याशी संबंधित समस्या) '२०१६-१७ या वर्षाच्या तुलनेत खाजगी गुंतवणूक मोठ्या प्रमाणात वाढण्याची शक्यता नाही.' तरीही 'जीडीपीचा विकास २०१७-१८ वर्षामध्ये ६.७५ टक्के ते ७.५ टक्के होईल', अशी अपेक्षा आर्थिक सर्वेक्षण अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. चलन व जीडीपी यांच्यातलं खालावलेलं प्रमाण आणि ठेवींचं वाढलेलं प्रमाण, यामुळे '२०१६-१७ या वर्षाच्या तुलनेत २०१७-१८ मध्ये बाजारपेठीय व्याजदर- ठेवी, कर्ज, व सरकारी सुरक्षा ठेवींवरील उत्पन्न यांची पातळी कमी असेल', असं सर्वेक्षणात म्हटलं आहे.

'आपला विश्वास असलेली गोष्ट वेळोवेळी सांगत राहावी, आणि आपली सहमती वा असहमती जाहीररीत्या दर्शवत राहावी', असं गटेनं म्हटलं होतं. या उक्तीला अनुसरून विश्लेषण करण्याचा प्रयत्न आम्ही 'इपीडब्ल्यू'च्या संपादकीय लेखांमधून नेहमीच करत आलो आहोत. परंतु पुरवठ्यानुसार मागणी निर्माण होते या नियमानुसार जगातील मुख्य प्रवाही अर्थव्यवस्था आता पूर्वपदावर गेली आहे; हा नियम आता विचारसरणीसारखा कार्यरत झाला आहे. तरीही आम्ही अशा प्रकारच्या स्थूल-अर्थशास्त्रावर दीर्घ काळ टीका करत आलो आहोत आणि आता सतत तोच सूर आळवून आम्ही थकलो आहोत. या पार्श्वभूमीवर नवअभिजाततावादी आर्थिक विचारकांचाच आवाज लोकांच्या कानांवर पडेल, अशी तजवीज मोठी माध्यमं व अकादमिक वर्तुळं करत असतात. कोणत्याही परिस्थितीत निर्माण झालेली मोठी वित्तीय तूट व मोठ्या प्रमाणातील कर्ज पुरवठा अशा विपरीत परिणामांवर (बाह्य कर्जांमध्ये वाढ, देशाच्या कर्जक्षमतेत घट, आयात-निर्यात व्यवहारातील असंतुलन, वाढते व्याजदर, खाजगी गुंतवणुकीची उलटी दिशा, चलनवाढीचे तणाव यांच्यावर) शिताफीनं पांघरूण घालण्याचं काम नवअभिजाततावादी अर्थतज्ज्ञ करताना दिसत आहेत.

केन्सविचारातील उपयुक्त संकल्पनांनाही दूर सारण्यात आलं आहे. उदाहरणार्थ, नफा दराविषयीच्या दीर्घकालीन अपेक्षा निराशाजनक आहेत, या पार्श्वभूमीवर ऋणको व धनको या दोघांच्याही जोखमींमधे वाढ होण्याची शक्यता आहे, पण त्याकडे फारसं लक्ष देण्यात आलेलं नाही. टिकाऊ भांडवली मालमत्तांना चल बनवून बाजारपेठेत सहजी उतरवता येईल अशा स्वरूपात आणलं जातं आहे, त्यामुळं गुंतवणूकदारांना मुख्यत्वे अल्पकालीन भांडवली लाभ व तोटे यांच्या अंदाजांवरून निर्णय घ्यावे लागत आहेत. मूल्यांकनाच्या पारंपरिक पायामध्ये कोणते बदल होत आहेत याची कुणकुण 'सर्वसाधारण जनते'ला लागण्याआधीच त्यासंबंधी योग्य अंदाज बांधणाऱ्या

व्यक्तींना यातून मोठे अल्पकालीन लाभ होत आहेत. असे लाभ मिळवण्याच्या प्रकारांमुळे अर्थव्यवस्थेच्या तुलनेत वित्तीय नफानिर्मिती वाढते. भारतानं १९९०च्या दशकात आंग्ल-अमेरिकी पद्धतीचं आर्थिक उदारीकरण स्वीकारलं, त्यातून वित्तीय आणि स्थावर मालमत्तेच्या संदर्भातील अंदाजबांधणीच्या कामाला गती आली. यामुळं संपत्तीविषयक विषमता सर्वाधिक असलेल्या देशांच्या यादीत भारताचा समावेश झाला. देशातील ७० टक्के संपत्ती किंवा एकूण खाजगी निव्वळ मालमत्तेतील मोठा वाटा मूठभर उच्चभ्रूंकडे आहे. परंतु भारतीय अर्थव्यवस्थेच्या अवस्थेचा लेखाजोखा मांडताना या मुद्द्याची नोंद व्हावी, असं आर्थिक सर्वेक्षण अहवाल लिहिणाऱ्यांना वाटत नाही. भारताच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनावर श्रीमंतांचं पूर्ण प्रभुत्व आहे आणि लोकशाही आता मृतप्राय झाली आहे - ही वस्तुस्थिती यातून समोर येते.

उदारमतवादी अर्थतज्ज्ञ अरविंद सुब्रमण्यम यांनी 'आर्थिक सर्वेक्षणा'तील नववं प्रकरण याच भूमिकेतून लिहिलं असावं. 'युनिव्हर्सल बेसिक इन्कम (यूबीआय): अ कॉनव्हर्सेशन विथ अँड विदिन द महात्मा' ('सार्वत्रिक पायाभूत उत्पन्न : महात्म्यासोबत व महात्म्यांतर्गत झालेला संवाद') असं या प्रकरणाचं शीर्षक आहे. त्यात सुरुवातीला खऱ्या अर्थानं सार्वत्रिक व विनाअट उत्पन्नाच्या पर्यायाची चर्चा करण्यात आली आहे, पण त्यानंतर त्यांनी विद्यमान कल्याणकारी योजना दूर सारणारा, संकुचित, सशर्त व अतिशय कमी पायाभूत उत्पन्नाचा पर्याय मांडला आहे. या संदर्भात चीनमध्ये १९७८ सालानंतर भांडवलशाहीच्या दिशेनं झालेली माघार आठवते; त्यामध्ये शेतकऱ्यांचं पैशातील उत्पन्न मोठ्या प्रमाणात वाढलं, पण त्यांना सामूहिकरीत्या मिळणारा अन्नधान्यांचा शिधा व वैद्यकीय सेवा संपुष्टात आली. सुब्रमण्यम यांनी सुचवलेलं चलन हस्तांतरण (वास्तविक, रुपयांमध्ये नोंदवण्यात आलेल्या यातील रकमा उदरनिर्वाहापुरत्यादेखील नाहीत) आणि श्रीमंत व राजकीय वर्गाची अनास्था, यांमुळे अशा चलन हस्तांतरणाची क्रयशक्तीही कालांतरानं कमी होत जाण्याची शक्यता आहे. सुब्रमण्यम यांच्या प्रस्तावाला पूर्णपणे नाकारावं, असं आम्ही सुचवत नसलो, तरी या प्रस्तावाद्वारे 'प्रत्येक डोळ्यातील अश्रू पुसले जातील' हा त्यांचा आशावादही आम्हाला विश्वसनीय वाटत नाही. विशेषतः इतर कल्याणकारी योजना (ग्रामीण रोजगार हमी व सार्वजनिक वितरण व्यवस्था) बाजूला सारून हे ध्येय गाठणं अवघड आहे. या योजनांच्या संदर्भात 'अतोनात सरकारी खर्च होतो' व 'पुनर्वितरणा'ची प्रक्रिया त्रासदायक ठरते, अशी ओरड भांडवली वर्ग आणि या वर्गाचे विचारवंत निश्चितपणे करतील. परंतु सार्वत्रिक पायाभूत उत्पन्नाचा हा पर्याय खरोखरीच सर्वसहमतीनं अमलात येणार असेल, तर ज्याँ द्रीझ यांनी सुचवल्यानुसार, 'विद्यमान रचनेचा पुढील टप्पा म्हणून किंवा त्या रचनेत सुधारणा म्हणून ही योजना आखली जावी, आधीच्या योजनांना पूर्णपणे बाजूला सारून ही अंमलबजावणी असू नये.'

०००

# केंद्रीय अर्थसंकल्प : पोकळ गाजावाजा

नरेंद्र मोदी सरकारचे अर्थमंत्री अरुण जेटली यांनी सादर केलेला चौथा अर्थसंकल्प (२०१७-१८ या वर्षासाठीचा) 'वित्तीय समंजसपणा' दाखवणारा आहे, 'अवाजवी लोकानुनयी' मार्ग त्यात अनुसरलेला नाही, अशी वाखाणणी माध्यमांनी अपेक्षेनुसार केली. हा अर्थसंकल्प 'गरीबहितैषी' आहे, शेतकऱ्यांनाही त्यातून लाभ होणार आहे, अधिक 'प्रगतिशील' कररचना त्यातून उभी राहील व काळ्या पैशाची निर्मिती घटेल, असे दावेही केले गेले. परंतु, या अर्थसंकल्पामुळं वंचितांची दुरवस्था दूर होईल, विषमता कमी होईल, रोजगार निर्माण होईल, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांची बुडीत कर्जे कमी होतील, सामाजिक कल्याणकारी कार्यक्रमांचं कामकाज सुधारेल, अशी शक्यता दिसत नाही.

वरील कोणतेच दावे सबळ स्वरूपाचे नाहीत, असं अर्थसंकल्पाच्या दस्तावेजांचं सूक्ष्म परीक्षण केल्यावर लक्षात येतं. हा अर्थसंकल्प म्हणजे पोकळ गहजब आहे. उलट, सर्वसामान्य भारतीयांच्या-विशेषतः गरिबांच्या व्यथांमध्ये भर टाकण्याचाच प्रयत्न यातून दिसतो आहे.

निश्चलनीकरणाद्वारे देशाच्या अर्थव्यवस्थेचा मोठा खोळंबा करण्याचा प्रकार या प्रयत्नांचाच भाग असावा.

जेटलींच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये 'राष्ट्रपिता' महात्मा गांधी असा उल्लेख वारंवार येत होता. पण 'महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेसाठीची अर्थसंकल्पातील तरतूद केवळ एक टक्क्यानं वाढवण्यात आली. विशेष म्हणजे हीच यासंबंधीची 'आत्तापर्यंतची सर्वाधिक' वाढ असल्याचंही नोंदवण्यात आलं आहे. चालू वर्षाच्या सुधारित अंदाजात या योजनेसाठीची तरतूद ४७,५०० कोटी रुपयांची होती, ती २०१७-१८ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजात वाढवून ४८,००० कोटी रुपये इतकी करण्यात आली, असं जेटलींनी सांगितलं. या योजनेअंतर्गत टिकाऊ मालमत्ता निर्माण करण्याची गरजही अर्थमंत्र्यांनी वारंवार मांडली. वास्तविक, मोदींनी या योजनेला काँग्रेसच्या अपयशाचं 'जिवंत स्मारक' असं संबोधलं होतं आणि आता त्यांचंच सरकार या योजनेची स्तुती करतं आहे. ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामाची मागणी वाढण्यामागचं आणखीही एक कारण प्राथमिक पुराव्यांवरून पुढं येतं आहे. निश्चलनीकरणाच्या निर्णयानंतर शहरांमधील उदरनिर्वाहाची साधनं गमावल्यामुळे अनेक लोक नागरी भागांकडून ग्रामीण भागांकडे स्थलांतरित झाले आहेत, यातून ग्रामीण भागांमध्ये कामाची मागणी वाढली आहे. खरं तर गावांमधून शहरांच्या दिशेनं होणाऱ्या स्थलांतराला आळा बसावा, हे या रोजगार योजनेचं एक उद्दिष्ट होतं. परंतु आता उलट्याच पद्धतीनं या योजनेची गरज वाढली असण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठीची तरतूद या वर्षी अधिक असायला हवी होती.

शिक्षण व आरोग्यसेवा यांसाठीच्या योजनांसाठीची तरतूदही फारशी वाढलेली नाही. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व स्त्रिया यांच्यासाठीच्या कल्याणकारी योजनांच्या बाबतीतही हीच परिस्थिती आहे. केंद्रीय करांच्या विभाज्य साठ्यातील राज्यांचा वाटा वाढवला तरी त्यातून या राज्यांकडे हस्तांतरित होणाऱ्या एकूण स्रोतांमध्ये वाढ होते असं नाही, हे 'सेंटर फॉर बजेट अँड गव्हर्नन्स अकाउन्टेबिलिटी'नं केलेल्या विश्लेषणातून स्पष्ट झालं आहे. सामाजिक कल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीमध्ये राज्यांनी अधिक जबाबदारी घ्यावी, असं आवाहन केलं जात असताना त्या संदर्भातील ही अवस्था चिंताजनक आहे. (स्वच्छ भारत कर व कृषी कल्याण कर यांसारख्या) उपकर व अधिभारांमधून केंद्र सरकार वाढीव उत्पन्न मिळवत असलं, तरी हे उत्पन्न राज्यांसोबत वाटल्या जाणाऱ्या विभाज्य करांच्या साठ्यामध्ये गृहीत धरलेलं नसतं.

उत्पन्नासंबधीच्या अर्थसंकल्पीय आकड्यांबाबत अनेक प्रश्न उपस्थित होतात. अर्थसंकल्प महिनाभर आधी सादर केल्यामुळं सुधारित अंदाज व अर्थसंकल्पीय अंदाज यांसाठी आधारभूत ठरलेली आकडेवारी अपुरी आहे. निश्चलनीकरणाच्या विपरीत परिणामाची तीव्रता कमी करण्याचा भारतीय जनता पक्षाचा राजकीय हेतू यातून साध्य होणार असला, तरी इतर काही गंभीर समस्या त्यातून उत्पन्न होतात. येत्या आर्थिक वर्षामध्ये देश वस्तू व सेवा कर व्यवस्थेच्या (गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स-जीएसटी) दिशेनं जाणार आहे, असा दावा सरकार करतं आहे. परंतु या नव्या आणि भिन्न प्रकारच्या अप्रत्यक्ष करव्यवस्थेपर्यंतचा प्रवास केंद्र आणि राज्य सरकारांच्या जकात व सेवा करांच्या वसुलीवर कशा प्रकारे परिणाम करेल, हे अजूनही अस्पष्टच आहे.

शिवाय सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांची निर्गुंतवणूक व व्यूहात्मक विक्री (म्हणजे खाजगीकरणाचाच वेगळा मार्ग) यांसंबंधी राजकीय सहमती प्रस्थापित करणं अवघड जाणार आहे, असं आर्थिक सर्वेक्षण अहवालातही नोंदवण्यात आलं आहे. निर्गुंतवणूक व खाजगीकरण या प्रक्रियांमधून अपेक्षित उद्दिष्ट गाठण्यात वर्षानुवर्षं अपयश येत असूनही सरकारनं या विभागातील एकवेळच्या प्राप्तीमध्ये मोठी वाढ गृहीत धरली आहे: २०१६-१७ च्या सुधारित अंदाजाच्या तुलनेत २०१७-१८ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात ६० टक्क्यांची वाढ गृहीत धरली आहे.

वैयक्तिक उत्पन्न कराच्या प्राप्तीमध्ये २५ टक्के वाढ होईल, अशी सरकारची अपेक्षा आहे. पण (हा जेटलींचाच शब्दप्रयोग वापरायचा तर) 'मुख्यत्वे करबुडवा समाज' असलेल्या आपल्या देशातील उत्पन्नकर भरणारे अचानक सज्जन बनणार आहेत का? की, 'इन्स्पेक्टर राज' व 'कर दहशतवाद' (सत्तेबाहेर असताना भाजपकडून हे शब्दप्रयोग वारंवार होत होते) अशा व्यवस्था पुन्हा येणार आहेत? हे प्रश्न सध्या तरी अनुत्तरितच आहेत. मोठ्या प्रमाणात

होणाऱ्या करबुडवेगिरीमुळं करवसुलीचा तणाव प्रामाणिक करदात्यांना अवाजवी प्रमाणात सहन करावा लागतो, हे अर्थमंत्र्यांनीच योग्यरित्या नमूद केलेलं आहे.

निवडणूक आयोगानं केलेल्या शिफारसीनुसार, राजकीय पक्षांना व्यक्तिगत दात्यांकडून मिळणाऱ्या निनावी वर्गणीची मर्यादा २० हजार रुपयांवरून दोन हजार रुपयांपर्यंत आणण्याचा प्रस्ताव अर्थमंत्र्यांनी मांडला. निवडणूक कर्जरोखे देण्यासंदर्भात रिझर्व बँक ऑफ इंडिया अधिनियमामध्ये सुधारणा करण्याचा प्रस्तावही जेटलींनी मांडला. प्रत्येक राजकीय पक्ष निर्धारित वेळेमध्ये उत्पन्न कर परतावा भरेल, असंही त्यांनी सांगितलं. परंतु हे उपाय वरवरचे आहेत आणि निवडणुकांमध्ये मोठ्या प्रमाणात होणाऱ्या काळ्या पैशांच्या वापराला यातून फारसा आळा बसणार नाही. याची चार प्रमुख कारणं आहेत. एक- राजकीय पक्षांनी अधिकृतरीत्या जाहीर केलेलं उत्पन्न हे त्यांच्या प्रत्यक्षातील एकूण खर्चाचा थोडासाच अंश दाखवणारं असतं. यातील बहुतांश रक्कम न नोंदवलेली व काळ्या निधींच्या रूपातील असते. दोन- 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स'नं दाखवल्यानुसार, राजकीय पक्षांनी जाहीर केलेल्या उत्पन्नाची तपासणी करण्यासाठी स्वतंत्र लेखापालांची व्यवस्था नाही किंवा नियमभंगासाठी दंड ठोठावण्याचा कोणताही प्रस्ताव याबाबत ठेवण्यात आलेला नाही. तीन- वेळेवर कर परतावा भरण्यासंदर्भात २०१०-११ व २०१४-१५ या कालावधीमध्ये भाजपनं सरासरी १८२ दिवसांचा विलंब केलेला आहे, तर काँग्रेसनं सरासरी १६६ दिवसांचा विलंब केलेला आहे, असा अंदाजही 'असोसिएशन फॉर डेमोक्रॅटिक रिफॉर्म्स'नं मांडलेला आहे. चार-अर्थसंकल्प सादर केल्यावर माध्यमांशी बोलताना जेटलींनी प्रस्तावित निवडणूक कर्जरोख्यांबद्दल व असे कर्जरोखे विकत घेणाऱ्यांना निनावी राहण्याची हमी देण्याबद्दल अनेक विधानं केली, परंतु भारतातील राजकीय निधीची व्यवस्था इतक्या घाईगडबडीत पारदर्शक होईल अशी आशा यातून निर्माण होत नाही.

याशिवाय, कच्च्या तेलाच्या जागतिक किमतींमध्ये वाढ झाल्यास त्याचा चलनवाढीच्या अंदाजांवर परिणाम होईल. हाही एक घटक अस्थिरता वाढवणारा ठरू शकतो. डाळींच्या किमती २०१५-१६ या वर्षामध्ये वाढल्या त्याप्रमाणे आता दूध, साखर, बटाटा व कांदा यांच्या किमती वाढण्याची शक्यता आहे, असा इशारा आर्थिक सर्वेक्षणात देण्यात आला आहे. त्यामुळं २०१७-१८ या वर्षामध्ये ग्राहकोपयोगी वस्तूंच्या किमतीचा निर्देशांक ४.२५ टक्के - ५ टक्के या पातळीवर मर्यादित ठेवला जाईल, हे गृहीतक अवास्तव ठरू शकतं. चलनवाढीच्या दरातील वाढीनं सरकारला वित्तीय तुटीचं ध्येय गाठण्याला मदत झाली तरी त्याचा गरिबांवर विपरीत परिणाम होईल. जागतिक अर्थव्यवस्थेतील अस्थिरता आणि पाश्चात्त्य देशांची वाढलेली सुरक्षिततावादी धोरणं यांचाही ताण भारताला सहन करावा लागणार आहे.

अर्थव्यवस्थेच्या वाढीचा दर कमी होतो आहे आणि विस्तारवादी वित्तीय धोरणाची गरज आहे, याचा उघड उल्लेखही अर्थसंकल्पात करण्यात आलेला नाही. हा अर्थसंकल्प कथितरीत्या 'गरिबांच्या बाजूला व श्रीमंतांच्या विरोधातला' आहे, असा आरडाओरडा केला जात असला, तरी त्यातील अनेक प्रस्ताव निराशाजनकच आहेत. यातून विषमता कमी होण्याची किंवा देशातील वंचितांच्या जीवनात मोठा बदल घडण्याची सुतराम शक्यता नाही.

०००

# 'सार्वत्रिक पायाभूत उत्पन्ना'चा प्रस्ताव

प्रत्येक व्यक्तीला उदरनिर्वाहाच्या पातळीवरचं उत्पन्न राज्यसंस्थेकडून विनाअट दिलं जाईल, अशा जगाची कल्पना करून पाहा. ज्याँ द्रीझ यांच्या शब्दांत सांगायचं तर, अशा उत्पन्न योजनेला कार्यक्षम सार्वजनिक सेवांची जोड देणं हा 'प्रतिष्ठित जीवनाच्या अधिकाराचं रक्षण करण्याचा अचूक मार्ग' आहे. 'आर्थिक सर्वेक्षण २०१६-१७' या अहवालातील 'युनिव्हर्सल बेसिक इन्कम (यूबीआय) : अ कॉनव्हर्सेशन विथ अँड विदिन द महात्मा' ('सार्वत्रिक पायाभूत उत्पन्न: महात्म्यासोबत व महात्म्यांतर्गत झालेला संवाद') या प्रकरणाचा आरंभ

असाच होतो. परंतु दुर्दैवानं, स्वतःहून लादून घेतलेल्या 'वित्तीय समंजसपणा'मुळं सार्वत्रिक पायाभूत उत्पन्नाच्या प्रस्तावासाठी 'सार्वजनिक वितरण व्यवस्था', 'महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना' व 'मध्यान्ह आहार योजना' अशा सामाजिकदृष्ट्या सर्वाधिक गरजेच्या कल्याणकारी योजनांना फाटा द्यावा लागणार आहे. त्यामुळं हा प्रस्ताव 'सार्वत्रिक'ही ठरत नाही, आणि 'पायाभूत'ही ठरत नाही. अन्न हस्तांतरण, किमान दिवसांच्या वेतनकामाची हमी व इतर सार्वजनिक सुरक्षा योजनांना दूर करून नुकसानभरपाईसारखा हा नवीन उत्पन्न हस्तांतरणाचा प्रस्ताव उभा राहातो.

सार्वत्रिक पायाभूत उत्पन्नाच्या मांडणीमध्ये अतार्किकता दिसत असली तरी अर्थसंकल्पीय निःपक्षपातीपणाला चिकटून राहण्याच्या इच्छेतून हे पाऊल उचललं असावं. देशाला ग्रासून असलेल्या भीषण आर्थिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर अशा पायाभूत उत्पन्न योजनेला अतिश्रीमंतांच्या उत्पन्नातून व संपत्ती करातून निधी पुरवला जाऊ शकतो. शिवाय सार्वजनिकदृष्ट्या कमी उपयुक्त आर्थिक कृतींवरील अप्रत्यक्ष करांमधूनही या योजनेसाठीच्या निधीत भर घालता येईल. सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत करांचं प्रमाण भारतात अतिशय कमी आहे. (संपत्ती व औद्योगिक करांचा समावेश असलेल्या) प्रत्यक्ष करांच्या बाबतीत हे प्रमाण आणखीच कमी आहे. या पार्श्वभूमीवर सार्वत्रिक पायाभूत उत्पन्नासारखी योजना राबवताना वित्तीय अवकाश वाढवण्यासाठी करवसुली वाढवण्याचा विचार या देशाचे धोरणकर्ते का करत नाही, हे अतर्क्य आहे.

उलट, आर्थिक सर्वेक्षण अहवालावरून स्पष्ट होत असल्यानुसार सार्वत्रिक पायाभूत उत्पन्नाची योजना सरकारच्या सामाजिक कल्याणकारी प्रशासकीय यंत्रणेमध्ये कपात घडवून अंमलात येणार आहे. भारतातील सध्याची सामाजिक सुरक्षा व्यवस्था बोजड, अकार्यक्षम व स्रोतांचं बहुतांश गैरवाटप करणारी आहे, या 'वास्तवा'चा विचार करता सरकारी पैसा सामाजिक कल्याणावर खर्च करण्याचे अधिक चांगले मार्ग शोधण्याची गरज आहे, असं अहवालातील संबंधित प्रकरणात लिहिलं आहे. सहा कल्याणकारी योजनांमध्ये स्रोतांचं मोठ्या प्रमाणावर गैरवाटप झाल्याचा मुद्दा अधोरेखित करताना या प्रकरणात सुलभीकरण करणाऱ्या दोन आकृत्या दिल्या आहेत. गरीब जिल्ह्यांमधील कल्याणकारी योजनांवरील खर्चाचा वाटा हा त्या जिल्ह्यांमधील गरीब व्यक्तींच्या वाट्यापेक्षा कमी आहे, असं या आकृत्यांमधून दाखवण्यात आलं आहे. या असमतोलावरचा उपाय म्हणून सार्वत्रिक पायाभूत उत्पन्नाची योजना आवश्यक असल्याचा दावा आर्थिक सर्वेक्षण अहवालाच्या लेखकांनी केला आहे. परंतु अशा प्रकारच्या कोणत्याही उपायाचा संबंध सार्वत्रिक पायाभूत उत्पन्नाशी नसून लक्ष्यकेंद्री रक्कम हस्तांतरणावर असेल.

या विविध कल्याणकारी योजनांच्या यंत्रणेमध्ये बाजारपेठीय अस्थिरतेपासून संरक्षण मिळण्याची अंगभूत व्यवस्था होती. सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे शेतकी क्रयवस्तू बाजारपेठांमध्ये राज्यसंस्थेचा हस्तक्षेप राहतो, यामुळं पूर्वीपासून या क्षेत्रात अधिक स्थिर किमती राहिल्या आणि शेतकऱ्यांना प्रातिनिधिक पातळीवर तरी उत्पन्नाची सुरक्षितता राहिली. सार्वजनिक खरेदी व्यवस्था व किमान आधारभूत किमतींना आलेलं राजकीय वजन पाहता अशा बाजारपेठांमधील हस्तक्षेपाचं महत्त्व लक्षात येतं. योग्य वेळी पोषणासोबतच शाळांमध्ये शिजलेलं अन्न दिल्यास विद्यार्थीसंख्या वाढते, हे मध्यान्ह आहार योजनेनं दाखवून दिलं आहे. ग्रामीण रोजगार योजनेमुळं किमान दिवसांचं वेतनकाम मिळतंच, पण त्याचसोबत स्थानिक पातळीवर नियोजन झालेल्या सार्वजनिक पायाभूत सुविधा निर्माण होण्याला मदत होते, कामाच्या मोसमी स्वरूपापासून संरक्षण मिळतं, ग्रामीण श्रम बाजारपेठेमध्ये कामगारांना वाटाघाटींसाठी थोडंसं बळ मिळतं. 'सार्वजनिक वितरण व्यवस्था संपुष्टात आल्यास अन्नधान्यांच्या बाजारपेठीय किमती वाढतील. गरिबांवर याचा परिणाम होईल. त्याचप्रमाणे महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेनंतर ग्रामीण अनौपचारिक क्षेत्रांतील कामगारांचं बाजारपेठीय वेतन कमी होईल', असा अंधुक उल्लेख आर्थिक सर्वेक्षणात करण्यात आला आहे, पण तरीही या व्यवस्थांच्या विरोधातील युक्तिवाद सर्वेक्षणात हिरिरीनं केला आहे.

भारतीय अन्न महामंडळाची खरेदी २००४-०५ ते २०११-१२ या काळात ७१ टक्क्यांनी वाढली आणि सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारे घरगुती वापरासाठी होणारी खरेदी ११७ टक्क्यांनी वाढली. या व्यवस्थेची व्याप्ती व

कार्यक्षमता वाढल्याचं यातून सूचित होत होतं, आणि यातून होणारी गळती ५४ टक्क्यांवरून ३५ टक्क्यांपर्यंत खाली आली. आर्थिक सर्वेक्षणामध्ये २०१६पर्यंतच्या गळतीची अंदाजी आकडेवारी देण्यात आली आहे, त्यानुसार ही गळती २०.८ टक्के आहे. परंतु गेल्या पाच वर्षांमध्ये या व्यवस्थेशी संबंधित तंत्रज्ञानात सुधारणा किंवा व्याप्तीमध्ये वाढ झालेली नाही. ग्रामीण वेतनामध्ये वाढ झाली आहे, त्याचं अंशतः श्रेय महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेला द्यावं लागेल. या योजनेअंतर्गत ग्रामीण भागात पायाभूत सुविधा व अलीकडच्या काळात शेतकी संपत्ती निर्माण होण्याला मोठा हातभार लागला, हे निःसंदिग्धपणे मान्य करावं लागतं.

सामाजिक सुरक्षा सेवा व वस्तू यांची तरतूद करणं हा मुद्दा भारताच्या दाक्षिणात्त्य राज्यांमध्ये आधीपासूनच राजकीय महत्त्वाचा राहिला आहे, पण आता तो उत्तर भारतीय राज्यांमध्येही महत्त्वाचा ठरतो आहे. किंबहुना यातल्या काही राज्यांमधील सार्वजनिक वितरण व्यवस्था व रोजगार हमी योजनेमध्ये भ्रष्टाचार आणि गळतीचं प्रमाण कमी झालं आहे. शिवाय, या व्यवस्थांतर्गत येणाऱ्या लोकसंख्येची व्याप्तीही वाढली आहे. इतर राज्यांमध्येही याचं अनुकरण होणं गरजेचं आहे. सार्वत्रिक पायाभूत उत्पन्नाच्या मुद्द्यावर 'गंभीर चर्चा करण्याची योग्य वेळ आली आहे', असं म्हणताना आर्थिक सर्वेक्षण अहवालात गतकाळातील लाभ व सामाजिक अनुभव यांची दखल घेण्यात आलेली नाही. उलट, कष्टानं अस्तित्त्वात आलेल्या विद्यमान सामाजिक कल्याणकारी योजनांना रद्द करण्याचीच भाषा यात आहे. लाभार्थींचा सहभाग, अधिक पारदर्शकता व उत्तरादायित्व, संबंधित बिगरसरकारी संस्थांचा समावेश, काही प्रमाणात राजकीय इच्छाशक्ती आणि सक्रिय स्थानिक प्रशासन यांच्याद्वारे सामाजिक कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी सुधारता येऊ शकते, हे गेल्या दशकात दिसून आलं आहे.

०००

## बहुसंख्य कामगार असुरक्षित

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या 'जागतिक रोजगार व सामाजिक दृष्टिकोन–कल २०१६' (वर्ल्ड एम्प्लॉयमेन्ट अँड सोशल आउटलूक– ट्रेन्ड्स २०१६) या अहवालामध्ये जागतिक असुरक्षित रोजगाराविषयीचे अंदाज वर्तवण्यात आले आहेत. भारतातील रोजगार दर २०१७ साली ३.५ टक्क्यांवरून ३.४ टक्क्यांवर येणं अपेक्षित असलं, तरी देशातील बेरोजगारांची संख्या २०१६ साली एक कोटी ७७ लाख होती, ती २०१८ साली एक कोटी ८० लाख इतकी होणार आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेनं केलेल्या 'असुरक्षित रोजगारा'च्या व्याख्येमध्ये स्वयंरोजगारात गुंतलेले कामगार व विनावेतन काम करणारे कौटुंबिक कामगार यांचा समावेश आहे. या गटातील कामगारांना चांगली कार्यपरिस्थिती, योग्य सामाजिक सुरक्षा व संघटनांच्या माध्यमातून परिणामकारक प्रतिनिधित्व, या गोष्टी उपलब्ध असण्याची शक्यता कमी असते. येत्या दोन वर्षांमध्ये असुरक्षित रोजगाराचा दर प्रतिवर्षी ०.२ टक्क्यांनी कमी होणं अपेक्षित आहे आणि जगभरातील अशा रोजगारात गुंतलेल्या कामगारांच्या वाट्याला 'केवळ परिघावरच्या सुधारणा' येण्याचीही शक्यता आहे, असं या अहवालात म्हटलं आहे. २०१७ साली एकूण रोजगारापैकी असुरक्षित रोजगाराचं प्रमाण ४२ टक्क्यांपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे, म्हणजे जगातील एकूण १ अब्ज ४० कोटी लोक या गटातील रोजगारामध्ये गुंतलेले असतील. उदयोन्मुख देशांमध्ये (भारताचा समावेश यात आहे) प्रत्येकी दोन कामगारांपैकी एक कामगार या व्याख्येत मोडतो, तर विकसनशील देशांमध्ये प्रत्येकी पाच कामगारांपैकी चार कामगार असुरक्षित रोजगारात गुंतलेले असतात. दक्षिण आशिया व सहारा वाळवंटाच्या दक्षिणेकडील आफ्रिकी देश (सब–सहारन आफ्रिका) या दोन प्रदेशांमध्ये असुरक्षित रोजगाराचं प्रमाण सर्वाधिक आहे. जागतिक पातळीवर अशा कामगारांची संख्या दर वर्षी एक कोटी १० लाखांनी वाढण्याची शक्यता आहे.

भारताविषयीची या अहवालातील आकडेवारी अनपेक्षित नाही. भारतातील बहुसंख्य–९२ टक्के– कामगार

अनौपचारिक क्षेत्रात काम करतात. शेतीच्या दुरवस्थेमुळं भूमिहीन मजुरांना व छोट्या शेतकऱ्यांना या क्षेत्राकडे– विशेषतः बांधकाम क्षेत्राकडे कामाच्या शोधात यावं लागलं. शिवाय, औपचारिक क्षेत्रातही नव्यानं निर्माण होणाऱ्या नोकऱ्या अनौपचारिक स्वरूपाच्या आहेत, कारण त्यात रोजगाराचे लाभ व सामाजिक सुरक्षा हे घटक नाहीत. ही परिस्थिती अधिक गंभीर आहे. सरकारकडून फारसं नियमन न होणाऱ्या अनौपचारिक क्षेत्रामधून अर्थव्यवस्थेमध्ये मात्र मोठं योगदान दिलं जातं. राज्यसंस्थेकडून मदत न होणाऱ्या लोकांना रोजगारही याच क्षेत्रात मिळतो. मुख्यत्वे उत्पादन, बांधकाम, वाहतूक, गोदाम, घाऊक व किरकोळ विक्री अशा उद्योगांमध्ये या गटातील कामगार कार्यरत असतात. स्त्रियांचं या क्षेत्रातलं प्रमाण खूप जास्त असल्याचंही सर्वज्ञात आहे. पुरुष कामगारांपेक्षा स्त्री कामगारांची परिस्थिती आणखीच संकटग्रस्त असते. वेतनाच्या बाबतीत लिंगभाव विषमतेला त्यांना सामोरं जावं लागतं आणि कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषणाची शक्यताही असते.

या क्षेत्रातील कामगारांना सहन करावी लागणारी असुरक्षितता दूर करण्यासाठी धोरणकर्त्यांनी व सरकारी उच्चपदस्थांनी प्रयत्न करायला हवेत. या कामगारांना अधिक औपचारिक, नियमित व सुरक्षित स्वरूपाचा रोजगार उपलब्ध होणं गरजेचं आहे. यासाठी या क्षेत्रातील कामाच्या परिस्थितीचं व वेतनाचं अधिक नियमन करणारे कायदे करायला हवेत, चांगल्या पायाभूत सुविधा व जोडणी उपलब्ध होण्यासाठी राज्यसंस्थेनं पाठबळ पुरवायला हवं. शिवाय, लघुउद्योजकांना व व्यवसायांना सहन करावा लागणारा गुंतागुंतीचा लाल फितीचा कारभार आणि भ्रष्टाचार या सर्वांत मोठ्या अडथळ्यांकडेही लक्ष द्यावं लागेल.

केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं (रालोआ) सरकार आणि राजस्थान व महाराष्ट्रातील भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाखालील सरकारं यांनी याबाबतीत विपरितच भूमिका घेतल्याचं दिसतं. रा. लो. आ. सरकारनं गाजावाजा करून अंमलात आणलेल्या निश्चलनीकरणाच्या प्रक्रियेनं अनौपचारिक क्षेत्रातील बहुसंख्य कामगारांवर भीषण परिणाम केलेले आहेत. यातील अनेकांना नोकऱ्या गमवाव्या लागल्या आणि त्यांच्या कुटुंबांना असह्य वंचनेला सामोरं जावं लागलं. या लोकांच्या यातनांची दखल अलीकडेच सादर झालेल्या अर्थसंकल्पात घेण्यात आली नाही. निश्चलनीकरणामुळं अनेक लघुद्योग बंद पडले त्याचीही दखल अर्थसंकल्पात घेण्यात आली नाही. उलट, अर्थमंत्र्यांनी त्यांच्या अर्थसंकल्पनीय भाषणात असं सांगितलं की, प्रस्थापित कामगार कायदे अधिक सुलभ केले जातील आणि वेतन, औद्योगिक संबंध, सामाजिक सुरक्षा व कल्याण, आणि सुरक्षितता व कार्यपरिस्थिती अशा चार नियमांमध्ये समाविष्ट केले जातील. प्रस्थापित कायदे आणि त्यांची खराब अंमलबजावणी यांचे संभाव्य लाभार्थी औपचारिक क्षेत्रातील थोडके कामगार असतात, त्यामुळं गुंतवणूकदारांच्या अनास्थेचा दोष या कामगारांवर टाकणं उपहासाचं ठरतं. कामगार कायद्यांचं वर्णन करताना ‘कालबाह्य’ हा शब्द सातत्यानं वापरला जातो आहे. या पार्श्वभूमीवर ‘औद्योगिक संबंध नियम विधेयक, २०१६’, ‘वेतन नियम विधेयक, २०१६’ यांद्वारे परिस्थिती सुधारणार असल्याचंही सांगितलं जातं आहे.

आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या अहवालानुसार, असुरक्षित रोजगारातील कामगारांची संख्या आशिया–पॅसिफिक प्रदेशामध्ये वाढण्याची शक्यता आहे. यावर काही परिचित उपायही अहवालात सुचवण्यात आले आहे, ते असे : रचनात्मक परिवर्तन; शिक्षण व कौशल्य यांमध्ये अधिक गुंतवणूक, जेणेकरून तथाकथित लोकशाही लाभांचा फायदा सर्वाधिक असुरक्षित गटांना घेता यावा; कापड, चामडे, शेती व अन्नप्रक्रिया अशा श्रमकेंद्री क्षेत्रांना सवलती, आणि भारताच्या कुख्यात निर्यात कर रचनेमध्ये सुधारणा. भारतातील असुरक्षित बहुसंख्यांना रोजगार सुरक्षा व प्रतिष्ठित वार्धक्य अनुभवता यावं यासाठी केंद्र सरकारनं या सूचनांकडे लक्ष देण्याची गरज आहे.

०००

‘वाटसरू’ सोलापुरात

**प्रोग्रेसिव्ह बुक सेंटर**
*शॉप नं. १०, युनायटेड रेसिडेन्सी,*
*१५९, रेल्वे लाईन, सोनामाता*
*शाळेसमोर, सोलापूर–४१३००३.*
*दू. ९४२२६४५०५५*

# पर्यावरणावर ट्रम्पवार

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २७ जानेवारी रोजी 'मुस्लिमांवर बंदी' जाहीर केली. इराक, इराण, लिबिया, सोमालिया, सुदान, सीरिया व येमेन इथल्या नागरिकांना अमेरिकेत प्रवेश करण्यापासून ९०/१२० दिवसांची बंदी घालण्यासंबंधीची ही घोषणा होती. ट्रम्प यांच्या या घोषणेवर मोठ्या प्रमाणावर लक्ष केंद्रित झाल्यामुळे पर्यावरण नियमनावर गंभीर परिणाम करणाऱ्या त्यांच्या अन्य कार्यकारी आदेशांकडे दुर्लक्ष झालं. व्हिसाबंदीचे जगभर पडसाद उमटणार आहेत, त्याचप्रमाणे ट्रम्प यांच्या पर्यावरणविषयक काही कृतींचे परिणामही जगभरात जाणवतील. त्यांच्या वर्तमान कृतींसोबतच भविष्यातील संभाव्य कृतींचा विचार करता याचा परिणाम अमेरिकेच्या हरितवायू उत्सर्जनावर होणार आहे, हे चिंताजनक आहे. अमेरिकेकडून सध्या होणाऱ्या हरितवायू उत्सर्जनाची पातळी पाहता, त्यात आणखी वाढ होणं किंवा परिस्थिती आहे तशीच राहणं, धोकादायकच ठरेल. हवामानबदल व जागतिक तापमानवाढ या प्रक्रिया थोपवण्यासाठी सुरू असलेल्या प्रयत्नांवर याचा विपरीत परिणाम होईल.

पर्यावरणवाद्यांबद्दल ट्रम्प यांना वाटणारा तिटकारा त्यांच्या प्रचारमोहिमेतच स्पष्ट झाला होता. या पार्श्वभूमीवर त्यांनी केलेली सल्लागारांची निवडही सुसंगत वाटते. पर्यावरण संरक्षण संस्थेच्या (एनव्हायर्न्मेन्टल प्रोटेक्शन एजन्सी–ईपीए) संचालकपदी स्कॉट प्रुइट यांच्या नियुक्तीवर शिक्कामोर्तब होण्यादरम्यानच्या काळासाठी या संस्थेचं हंगामी नेतृत्व मायरन इबेल यांना देण्यात आलं आहे. पर्यावरणीय चळवळ ही आधुनिक जगाच्या स्वातंत्र्य व संपन्नतेला सर्वांत मोठा धोका आहे, असं इबेल यांनी जाहीररीत्या म्हटलं होतं. 'कॉम्पिटिटीव्ह एन्टरप्राइझ इन्स्टिट्यूट' या अतिसनातनी संस्थेचे ते संचालक आहेत. प्रुइट यांनी हवामानबदलाच्या प्रश्नालाच नकार दिलेला आहे. ओक्लाहामा राज्याचे ॲटर्नी जनरल म्हणून त्यांनी तेल कंपन्यांच्या वतीनं ईपीएविरोधात १४ न्यायालयीन याचिका दाखल केलेल्या आहेत. अशा मंडळींना आता नवीन सरकारच्या अखत्यारित पर्यावरणरक्षणाचं काम देण्यात आलेलं आहे, यावरून भविष्यात काय व किती अनिष्ट घडेल याचे संकेत आपल्याला मिळतात.

राष्ट्राध्यक्षपदाची शपथ घेतल्यावर काहीच दिवसांमध्ये ट्रम्प यांनी ईपीएचा निधी गोठवण्याची घोषणा केली. शिवाय या संस्थेतील १५ हजार अभियंते व वैज्ञानिक यांपैकी मोठ्या प्रमाणात कर्मचारी वर्ग कमी करावा, असं सांगितलं. (प्रचारमोहिमेवेळी तर ट्रम्प यांनी ईपीए बरखास्त करण्यासंबंधी संकेत दिले होते). ईपीएच्या कर्मचाऱ्यांनी संशोधनाचे निष्कर्ष प्रसारमाध्यमांना वा इतर कोणालाही सांगू नयेत, त्यावर चर्चा करू नये, असं सांगत ट्रम्प यांनी या संस्थेची उघड मुस्कटदाबीच केली आहे. त्यामुळं हरितवायू उत्सर्जनासारख्या घडामोडींची ताजी आकडेवारी आता या संस्थेद्वारे सार्वजनिक अवकाशात उपलब्ध होणार नाही. 'व्हाइट हाउस क्लायमेट चेंज' या पानाची जागा आता 'ॲन अमेरिका फर्स्ट एनर्जी प्लॅन' या पानानं घेतली आहे, हेही या पार्श्वभूमीवर आश्चर्यकारक वाटत नाही. या नवीन पानावर हवामानबदलाचा उल्लेखही नाही. ट्रम्प यांच्या दृष्टीनुसार, या ऊर्जा योजनेमध्ये अंदाजे ५० खर्व डॉलर इतके प्रवाळ, तेल व नैसर्गिक वायूचे साठे– विशेषतः संघराज्यांच्या जमिनीतील साठे बाहेर काढण्याचं उद्दिष्ट आहे. आधीच्या सरकारनं 'हवामान कृती योजना' व 'स्वच्छ ऊर्जा योजना' यांद्वारे ज्या गोष्टी रूढ केल्या होत्या, त्यांना तातडीनं बाजूला सारण्याचं काम ट्रम्प यांचं सरकार करत आहे. जीवाश्म इंधनविषयक दबाव गटांना अडथळ्यांविना कार्यरत राहता यावं, यासाठी हे सरकार मार्ग मोकळा करत आहे. हे सर्व अमेरिकेला पुन्हा महान बनवण्यासाठी आणि अमेरिकींना नोकऱ्या देण्यासाठी सुरू असल्याचंही सांगितलं जातं आहे.

या सर्व घडामोडींचे गंभीर परिणाम केवळ अमेरिकेवरच नव्हे, तर संपूर्ण जगावर होणार आहेत. वायूंच्या जागतिक साठ्यासाठी जबाबदार धरण्यात आलेल्या औद्योगिक देशांमधील हरितवायू उत्सर्जन कमी व्हावं, याकरिता कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक 'क्योटो नियमावली' अस्तित्वात आली, परंतु अमेरिकेनं त्यावर स्वाक्षरी केली

नाही. पण हरितवायू उत्सर्जन कमी करण्यासाठी प्रत्येक देशाला स्वतःची 'इच्छित राष्ट्रीय निग्रही वचनं' निश्चित करण्याची मुभा देणाऱ्या पॅरिस करारासंबंधीच्या प्रक्रियेत २०१५ साली ओबामा सरकार सहभागी झालं. कार्बन डायऑक्साइडचं उत्सर्जन २००५च्या पातळीपेक्षा २०३० सालापर्यंत ३० टक्क्यांनी खाली आणण्याचा निर्धार अमेरिकेनं व्यक्त केला. वरकरणी या उद्दिष्टांपैकी २७ टक्के कामगिरी आधीच पूर्ण झाली आहे. परंतु उत्सर्जनाला कारणीभूत ठरणाऱ्या इतर घटकांबाबत अमेरिकेनं फारशी प्रगती केलेली नाही. यामध्ये तिथली वाहतूक व्यवस्था (उत्सर्जनात २६ टक्के वाटा) व शेती (उत्सर्जनात ९ टक्के वाटा) यांचा समावेश आहे.

पॅरिस करारातून बाहेर पडण्याची धमकी ट्रम्प यांनी निवडणुकीच्या प्रचारावेळी दिली होती. प्रत्यक्षात असं पाऊल अमेरिकेनं उचललं नाही, तरी ती आपल्या वचनांपासून माघारी फिरण्याची शक्यता आहे. हरितवायू उत्सर्जन कमी करण्यासाठी 'पॅरिस करारा'द्वारे दिलेली वचनं सर्व स्वाक्षरीकर्त्या देशांनी पूर्ण केली, तरी जागतिक तापमानवाढीचं प्रमाण दोन अंश सेल्सियस या मर्यादेत ठेवण्याचं उद्दिष्ट साध्य होणं अवघड आहे, 'वर्ल्ड रिसोर्सेस इन्स्टिट्यूट'च्या अहवालात म्हटलं आहे. अशा परिस्थितीत जगातील सर्वांत मोठ्या अर्थव्यवस्थांपैकी एक असलेल्या अमेरिकेनं या वचनांचा विचारच न करण्याचं ठरवलं तर त्याचे गंभीर परिणाम होतील.

हवामानबदल करारासंबंधीची आपली वचनबद्धता ट्रम्प सरकार सक्रियरीत्या कमी करण्याची शक्यता आहेच, शिवाय निधीचा मुद्दाही तितकाच गंभीर आहे. हवामानबदलाशी सामना करणं आणि स्वच्छ उर्जेशी जुळवून घेण्याकरिता गरीब देशांना मदत व्हावी यासाठी १०० अब्ज डॉलर इतका हरित हवामान निधी उभारण्याचं संयुक्त राष्ट्रांनी ठरवलं. या निधीमध्ये २०२० सालापर्यंत तीन अब्ज डॉलरचं योगदान देण्याचं वचन अमेरिकेनं पॅरिस परिषदेवेळी दिलं होतं. परंतु आत्तापर्यंत अमेरिकेनं या निधीत ५० कोटी डॉलरचंच योगदान दिलं आहे. रिपब्लिकन पक्षाचं प्रभुत्व असलेल्या प्रतिनिधीगृहात होत असलेला प्रतिकार याला अंशतः कारणीभूत ठरला. हवामानबदलाविषयीचा ट्रम्प सरकारचा दृष्टिकोन पाहता अमेरिका या वचनांची पूर्तता करणार नाही, अशीच शक्यता दिसते आहे.

व्हाइट हाउसमध्ये हवामानबदलाविषयी अनास्था राखणारी व्यक्ती असणं जगासाठी अनेक अर्थांनी संकटकारक ठरू शकतं, हे आधीच स्पष्ट झालं आहे. एक– ट्रम्प यांचं सरकार जीवाश्म इंधनांच्या अधिकाधिक वापराला प्रोत्साहन देईल आणि त्यासाठी सध्याची पर्यावरणीय नियमनं धुडकावेल. त्यामुळं पॅरिस कराराद्वारे अमेरिकेनं स्वतःसाठी निश्चित केलेली हरितवायू उत्सर्जनाविषयीची उद्दिष्ट पूर्ण होण्याचीही शक्यता नाही. दोन– जागतिक तापमानवाढीमुळं निर्माण झालेल्या पर्यावरणीय संकटाशी सामना करण्यासाठीच्या जागतिक प्रयत्नांना या नवीन अमेरिकी भूमिकेमुळे खीळ बसेल. युद्धग्रस्ततेमुळे निर्वासित जिणं जगणाऱ्या लोकांकडे पाठ फिरवणारा अमेरिकेसारखा देश स्वतःच या युद्धांना अंशतः कारणीभूत ठरत आलेला आहे. आता हाच देश गरीब देशांमधील लाखो लोकांना पर्यावरणीय निर्वासित बनवणारा मार्ग अनुसरतो आहे.

०००

**(अनु. : प्रतिनिधी)**

*इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीची संपादकीये अनुवादित करण्यासाठी 'द एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे.*

●

(EPW, 4 & 11 Feb., 2017)

**वाटसरू / युनिक पुस्तके मिळण्याचे ठिकाण**

**डिस्काउंट बुक शॉप**
विजया बेकरी बसस्टॉपसमोर,
विद्यापीठ रोड, कोल्हापूर
संपर्क : संजय चिपरे,
भ्र. ७७४४८०१५०९